(CNR NO.MHAM070020312025)

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.४९/२०२६**
**निलेश ... वि... निरंक**
**मध्ये निशाणी ०१ लगत आदेश**

:: **आदेश** ::

१. अर्जदाराने सदरचा अर्ज वारसाचे प्रमाणपत्र मिळणे कामी दाखल केलेला आहे. अर्जदार चा भाउ **चेतन अशोकराव चोरे** हे दिनांक ०९/०१/२०२६ रोजी मयत झाले आहेत. तसेच अर्जदाराचे वडील **अशोक लक्ष्मणराव चोरे** हे दि.०८/१०/२०१६ व आई **सुजाता अशोकराव चोरे** ही दि.१७/०२/२०२३ रोजी मयत आहे. अर्जदार हा मयताचा भाउ या नात्याने कायदेशिर वारस आहे.

२. अर्जदारांच्या अर्जातील कथनांनुसार त्यांना खाजगी व शासकीय कामासाठी प्रस्तुत प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने त्यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. या अर्जासोबत अर्जदारांनी नि.क्र.४ खाली मयताच्या मृत्यु प्रमाणपत्राची प्रमाणित प्रत, अर्जदार यांचे आधार कार्डाची प्रत दाखल केली आहे.

३. अर्जाचे पृष्ट्यार्थ अर्जदार **निलेश अशोकराव चोरे** यांनी नि.क्र.०८ वर स्वतःचे पुराव्याचे शपथपत्र दाखल केले आहे. त्यामध्ये अर्जदाराने अर्जातील मजकुराचा शपथेवर पुर्नउच्चार केला आहे. याशिवाय, अर्जदारांनी मयत **चेतन अशोकराव चोरे** यांचे मृत्युचे प्रमाणपत्र नि.क्र.०९ वर दाखल केलेले आहे. तसेच सुजाता अशोकराव चोरे यांचे मृत्युचे प्रमाणपत्र नि.क्र.१० वर दाखल केलेले आहे. तसेच अशोक लक्ष्मणराव चोरे यांचे मृत्युचे प्रमाणपत्र नि.क्र.११ वर दाखल केलेले आहे. तसेच अर्जदार यांच्या कार्डच्या साक्षांकीत प्रत दाखल केलेली आहे. अर्जदार याने त्याचे पुराव्यात तो मयत **चेतन अशोकराव चोरे** यांचे वारस

असल्याचे कथन केले आहे. तसेच सदर वारस वगळता मयत **चेतन अशोकराव चोरे** यांना इतर कोणीही वारस नसल्याचे अर्जदार यांनी पुराव्यात सांगीतले आहे. तसेच अर्जदाराने मयत **चेतन अशोकराव चोरे** यांची आई सुजाता अशोकराव चोरे ही दि.१७/०२/२०२३ रोजी मयत झालेली आहे असे सांगीतले आहे.

४. प्रस्तुत अर्जामध्ये अर्जदार याने त्याचे मयत भाउ चेतन अशोकराव चोरे याचे वारस प्रमाणपत्र मागीतलेले आहे. मयत चेतन अशोकराव चोरे याची आई सुजाता अशोकराव चोरे ही मयत झालेली आहे. तसेच अर्जदाराने मयत चेतन अशोकराव चोरे हा अविवाहीत व निपुत्रीक मयत झालेला असल्याचे शपथेवर कथन केलेले आहे. तसेच मयत चेतन अशोकराव चोरे यांचे वडील अशोकराव लक्ष्मण चोरे हे सुध्दा मयत झालेले आहेत. तसेच अर्जदाराने त्याला व चेतन अशोकराव चोरे यांना सख्खी बहीण नसल्याचे सुध्दा कथन केले आहे. वरील परिस्थीती पाहता अर्जदार हा मयत चेतन अशोकराव चोरे चा सख्खा भाउ असुन हिंदु वारसा कायदा क्लास २ चे शेड्युल क्लास २ प्रमाणे वारस होत आहे.

५. अर्जातील कथनांस व विनंतीस कोणाचा आक्षेप आहे की, नाही हे पडताळून पाहणे कामी अर्जातील मजकुराची जाहीर प्रसिध्दी स्थानिक वृत्तपत्र "**दैनिक मात्रृभुमी**" च्या दिनांक १९/०२/२०२६ च्या आवृत्तीत प्रसिध्द केली गेली. सदरचे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ते हा आदेश होईपर्यंत कोणत्याही व्यक्तीचा विरोध वा आक्षेप या न्यायालयास प्राप्त झाला नाही. अर्जदार **निलेश अशोकराव चोरे** यांची साक्ष नि.क्र.०८ वर शपथपत्राव्दारे नोंदविण्यात आली आहे. त्यांची साक्ष ही उलट तपासाविना असल्यामुळे अबाधित आहे.

(CNR NO.MHAM070020312025) **किरकोळ दिवाणी अर्ज क्र.४९/२०२६**

**निलेश ... वि... निरंक**

**मध्ये निशाणी ०१ लगत आदेश**

शपथपत्रातील केलेले अभिकथन हे अर्जातील नमुद कथनांस मिळते–जुळते आहे. त्यामुळे अर्जातील कथन, तोंडी व कागदोपत्री पुरावा, इत्यादीचा विचार करता हे सिध्द होते की, अर्जदार हेच मयत **चेतन अशोकराव चोरे** यांच्या पश्चात कायदेशीर वारस आहेत. त्यांच्या शिवाय इतर कोणीही वारस नाहीत. म्हणुन सदर पुरावा ग्राह्य धरणे योग्य होईल. करिता अर्जदार यांना मयत **चेतन अशोकराव चोरे** यांचे कायदेशिर औपचारीक वारस (formal legal heir) म्हणुन वारस प्रमाणपत्र देणे योग्य होईल. त्यामुळे खालील प्रमाणे ओदश करण्यात येते आहे.

**आदेश**

१. अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. अर्जदार हे मयत **चेतन अशोकराव चोरे** यांचे कायदेशिर वारस असल्याबाबतचे वारसाचे प्रमाणपत्र त्यांच्याकडुन योग्य तो मुद्रांक शुल्क घेवून त्यांच्या नावे देण्यात यावा.

SAGAR BHARAT BAHIRAT

Digitally signed by SAGAR BHARAT BAHIRAT
Date: 2026.04.18 13:45:55 +0530

अंजनगाव सुर्जी

दिनांकः १८/०४/२०२६

**(एस.बी. बहीरट)**

दिवाणी न्यायाधीश क.स्तर,

अंजनगाव सुर्जी